नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल ®
सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६२। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार २८/१०/२०२६ । पाने- ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

# प्रलंबित मागण्यांसाठी हजारो शेतकऱ्यांची मुंबईकडे कूच

## आरपारच्या लढ्याचा निर्धार, मुख्यमंत्र्यांकडून बैठकीचे निमंत्रण

युवावार्ता (प्रतिनिधी)

दुष्काळाने होरपळलेला शेतकरी, कर्जाच्या विळख्यात अडकलेला बळीराजा, वनजमिनींच्या हक्कांसाठी संघर्ष करणारे आदिवासी बांधव आणि न्याय्य वेतनाच्या प्रतीक्षेत असलेले ग्रामीण कष्टकरी यांच्या प्रश्नांवरून राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली तब्बल १,००० हून अधिक वाहनांतून १२ हजारांहून अधिक शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा भव्य वाहन लाँग मार्च सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी अकोले येथून मुंबईच्या दिशेने रवाना झाला. दुष्काळी मदत, कर्जमाफी, वनहक्क, थकीत सन्मान निधी, महिला योजनांचे प्रलंबित लाभ आणि कामगारांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घ्या; अन्यथा संघर्ष अटळ आहे, असा स्पष्ट इशारा या आंदोलनातून देण्यात आला.

महाराष्ट्रातील २० हून अधिक जिल्ह्यांतून आलेल्या आंदोलकांच्या वाहनांचा ताफा लाल झेंड्यांनी सजला असून, मागण्यांचे फलक, लाल बिल्ले आणि सरकारविरोधी घोषणांनी अकोले परिसर दुमदुमून गेला. सुमारे २०० किलोमीटरहून अधिक अंतर पार करून मुंबईतील मुख्यमंत्री निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्याकडे कूच करण्याचा निर्धार आंदोलकांनी केला आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी हा लढा निर्णायक टप्प्यावर नेण्याची भूमिका किसान सभेने घेतली आहे.

लाल झेंड्यांच्या महासागराने अकोले दुमदुमले!

वाहन लाँग मार्च सुरू होण्यापूर्वी अकोले शहरातून शेकडो लाल झेंड्यांसह भव्य पायी मोर्चा काढण्यात आला. गगनभेदी घोषणांनी शहरातील वातावरण संघर्षमय झाले. अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, राष्ट्रीय महासचिव डॉ. विजू कृष्णन, राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले, माकपचे आमदार विनोद निकोले, किसान सभेचे राज्य अध्यक्ष यशवंत झाडे, राज्य सचिव उमेश देशमुख आणि राज्य खजिनदार सदाशिव साबळे यांच्यासह राज्यातील विविध पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोर्चाचे नेतृत्व केले.




यावेळी किसन गुजर, रडका कलांगडा, किरण गहला, चंद्रकांत धांगडा, देविदास गावित, नामदेव भांगरे, डॉ. अमोल वाघमारे, उद्धव पौळ, अर्जुन आडे, शंकर सिडाम, ड. अजय बुरांडे, शामसिंग पाडवी आणि महादेव गारपवार आदी उपस्थित होते. नाशिक जिल्ह्यातून आलेला वाहनांचा ताफा किसान सभेचे माजी राज्य अध्यक्ष तथा माजी आमदार जे. पी. गावीत, जिल्हा सचिव इरफान शेख, इंद्रजित गावीत आणि सुनील मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली घोटी येथे मुख्य मोर्चात सहभागी झाला.

पाच हजारांची मदत म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ!

राज्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता शेतकरी कुटुंबांना जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत अत्यंत तुटपुंजी असल्याची टीका किसान सभेने केली आहे. राज्यातील ३५८ पैकी ३०५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्याच्या पार्श्वभूमीवर पीक नुकसानीची पुरेशी भरपाई, पीक विम्याची रक्कम तातडीने मिळण्यासाठी उपाययोजना आणि संकटग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दुष्काळामुळे उत्पादन घटले, शेतीचा खर्च वाढला आणि उत्पन्नाचे गणित कोलमडले असताना तुटपुंज्या मदतीने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यामुळे केवळ घोषणांऐवजी प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

**कर्जमाफी नियमित कर्जदारांनाही द्या; जमिनींचे हक्क नोंदवा!**

दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही मिळावा, अशी प्रमुख मागणी लाँग मार्चमधून करण्यात आली आहे. केवळ थकबाकीदार शेतकऱ्यांनाच लाभ देऊन वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय करू नये, असे किसान सभेचे म्हणणे आहे.

वनजमिनी, देवस्थान ट्रस्टच्या जमिनी, इनाम जमिनी आणि गायरान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे हक्क त्यांच्या नावे नोंदवावेत. पिढ्यान्पिढ्या जमिनी कसूनही मालकी हक्कांपासून वंचित राहिलेल्या कुटुंबांना न्याय द्यावा, अशी मागणीही आंदोलनातून करण्यात आली.

**शेतकऱ्यांसह आशा, अंगणवाडी आणि बांधकाम कामगारांचाही आवाज -**

हा लाँग मार्च केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांपुरता मर्यादित नसून ग्रामीण कष्टकरी वर्गाच्या व्यापक प्रश्नांना वाचा फोडणारा ठरत आहे. पेसा कर्मचारी, बांधकाम कामगार, पोषण आहार कर्मचारी, (पान २ वर)

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

## मशीन लर्निंग आणि क्लाऊड कम्प्युटिंगमधील संशोधनासाठी
## डॉ. सुदीप किसन हासे यांची कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये पीएच. डी.

### स्कोपस इंडेक्स्ड जर्नल्समध्ये चार संशोधन लेख



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : व्यवसायाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे दैनिक युवावार्ता, युवा पॉलिप्रिंट आणि युवा उद्योग समूहाचे संचालक सुदीप किसन हासे यांनी ओरिएंटल विद्यापीठ, इंदोर येथून संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विषयातील पीएच.डी. यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

सुदीप हासे यांनी Design and Analysis of Cloud Deployed Intelligent Analysis of Real Time Twitter Data (TSaaS) या विषयावर संशोधन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग, डीप लर्निंग आणि क्लाऊड कम्प्युटिंग या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांवर त्यांनी आपल्या संशोधनात विशेष लक्ष केंद्रित केले.

पीएच.डी.च्या संशोधनकाळात त्यांनी नामांकित स्कोपस इंडेक्स्ड जर्नल्समध्ये चार संशोधन लेख प्रकाशित केले. तसेच स्कोपस इंडेक्स्ड तीन परिषदांमध्ये शोधनिबंध प्रकाशित केले. याशिवाय एक पुस्तक आणि एक पुस्तकातील प्रकरण (बुक चॅप्टर) प्रकाशित करून त्यांनी संशोधन व ज्ञाननिर्मिती क्षेत्रातील आपले योगदान अधोरेखित केले आहे.

सुदीप हासे यांनी यापूर्वी नामांकित **ESDS Software Solutions Pvt. Ltd.** या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीमध्येही काम केले आहे. त्यानंतर ८ वर्षे त्यांनी अमृतवाहिनीमध्ये प्रोफेसर म्हणून काम पाहिजे. आयटी क्षेत्रातील व्यावसायिक अनुभव आणि आधुनिक तंत्रज्ञानातील रुची यांचा उपयोग त्यांनी पुढील संशोधनासाठी केला. डॉ. हासे हे लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरसारख्या (पान ५ वर)

हॉलमार्क प्रमाणित
AN ISO 9001:2008
GOVT. APPROVED VALUER
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
*नियम व अटी लागू
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

राजपाल
खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
वस्त्रांच्या कापडांची अखंड परंपरा राजपाल

सणासुदीत सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50% पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे विरोधात महायुतीचे आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्य सभेतील विरोधी पक्ष नेते मल्लिका अर्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या निषेधार्थ महायुतीच्या अधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत संगमनेर बसस्थानक परिसरात महायुतीच्या वतीने खरगे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांच्या प्रतिकात्मक प्रतिमा पायदळी तुडवून जाहीर निषेध करत आंदोलन करण्यात आले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेल्या विधानामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांत संतापाची भावना निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) यांच्यासह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत बसस्थानक परिसरात जोरदार घोषणाबाजी करत जाहीर निषेध केला

या आंदोलनामध्ये आदिशक्ती फाउंडेशन अध्यक्षा तथा आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ भाजपच्या शहराध्यक्ष पायल ताजणे, उपाध्यक्ष ज्योती भोर, शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख सुशील शेवाळे, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, आर पी आय चे शहराध्यक्ष कैलास कासार यांच्यासह भाजप, शिवसेना आणि महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून माणसाला माणूस जोडून महायुतीचा भगवा पुढे नेण्याचे काम सुरु आहे. परंतु काँग्रेसवाले चांगल्या चाललेल्या कामामध्ये खोडा घालण्याचे काम करत आहे याच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विषयी अक्षेपार्य विधान करणाऱ्यांचा आमदार अमोल खताळ पा. आणि महायुतीच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे आदिशक्ती फाउंडेशन संगमनेरचे अध्यक्षा नीलम अमोल खताळ यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत कार्यालयात महिला कर्मचाऱ्याची निर्घृण हत्या!

## डोक्यात लोखंडी वस्तूने वार करून खून; आरोपीला अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

भिंगार - अहिल्यानगर शहराजवळील भिंगार परिसरातील वडरवाडी ग्रामपंचायत कार्यालयात महिला कर्मचाऱ्याची हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अनिता आळकुटे असे मृत महिला कर्मचाऱ्याचे नाव असून, संतोष धोत्रे याने त्यांच्या डोक्यात लोखंडी वस्तूने वार केल्याने त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी संतोष धोत्रे याला अटक केली असून, घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. या घटनेमुळे भिंगार परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

वडरवाडी ग्रामपंचायत कार्यालयात घडलेल्या या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला कर्मचारी अनिता आळकुटे यांच्यावर लोखंडी वस्तूने डोक्यात वार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या आळकुटे यांचा मृत्यू झाला. भरवस्तीत आणि ग्रामपंचायत कार्यालयासारख्या ठिकाणी महिलेची हत्या झाल्याने नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

पोलिसांची घटनास्थळी धाव

घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक कार्यवाही सुरू केली. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला.

आरोपीला अटक; हत्येमागील कारणाचा शोध सुरू

या प्रकरणातील संशयित आरोपी संतोष धोत्रे याला पोलिसांनी अटक केली आहे. मात्र, अनिता आळकुटे यांच्यावर हल्ला नेमका कोणत्या कारणातून करण्यात आला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. वैयक्तिक वादातून हा प्रकार घडला की त्यामागे अन्य काही कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.

वडरवाडी ग्रामपंचायत कार्यालयात घडलेल्या या हत्येने परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. पुढील तपास भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

# पुणे पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीत गोंधळ

पुणे (प्रतिनिधी)

राज्यभरातील शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या ५ जागांसाठी आज मतमोजणी होत असून, संपूर्ण राज्याचे लक्ष या निकालाकडे लागले आहे. मात्र, पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुणे पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणी केंद्रावर आज सकाळी मोठा गोंधळ उडाला. मतमोजणी केंद्रात आलेल्या ८ मतपेट्यांना सील नसल्याचा गंभीर आक्षेप महाविकास आघाडीच्या उमेदवार हर्षदा जाधव यांनी घेतला. या आक्षेपामुळे आणि निर्माण झालेल्या गोंधळामुळे मतमोजणीची प्रक्रिया काही वेळासाठी थांबवण्यात आली होती.

विधान परिषद निवडणुकीसाठी आज मतमोजणी सुरू असताना, पुणे पदवीधर मतदारसंघाच्या केंद्रावर मविआच्या उमेदवार हर्षदा जाधव यांनी मतपेट्यांच्या सीलबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, केंद्रावर आणलेल्या ८ मतपेट्यांना योग्यरीत्या सील लावण्यात आलेले नव्हते. या मुद्द्यावरून तिथे उपस्थित मविआचे कार्यकर्ते आणि उमेदवारांनी जोरदार आक्षेप नोंदवला, ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. निवडणूक अधिकाऱ्यांनी यावर तातडीने तोडगा काढण्याचा प्रयत्न केला, मात्र गोंधळामुळे मतमोजणीची प्रक्रिया तात्पुरती थांबवावी लागली.आज ५ जागांसाठी (३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघ) निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये थेट आणि अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. मात्र, अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत आणि मोठ्या प्रमाणावर झालेली बंडखोरी यामुळे निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या बंडखोरीचा फटका कुणाला बसणार आणि कोणाचा खेळ बिघडणार, हे आज स्पष्ट होणार आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघातही मोठी चुरस आहे. येथे भाजपकडून कौस्तुभ गावडे, काँग्रेसकडून (मविआ) जयंत आसगावकर, तर शिंदे गटाने पाठिंबा दिलेले अपक्ष सचिन सानप आणि अपक्ष उमेदवार दत्तात्रय सावंत यांच्यात काट्याची लढत आहे.

# राज्यातील सर्व १९ सीईटी परीक्षांसाठी आता दोन संधी

मुंबई (वृत्तसंस्था)

व्यावसायिक, वैद्यकीय आणि इतर उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून परीक्षा देण्यासाठी दोन संधी मिळतील, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी (२६ ऑक्टोबर २०२६) सांगितले. या निर्णयामुळे राज्य सीईटी सेलद्वारे आयोजित सर्व १९ सीईटी परीक्षांना ही सुविधा लागू होईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे गुण सुधारण्याची अतिरिक्त संधी मिळेल. आतापर्यंत, अभियांत्रिकी आणि एमबीए/एमएमएस यांसारख्या निवडक अभ्यासक्रमांसाठीच दोन संधी दिल्या जात होत्या. लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठातील एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी हा निर्णय जाहीर केला.

गेल्या वर्षी सीईटी सेलने निवडक अभ्यासक्रमांसाठी एप्रिल आणि मे महिन्यात दोन परीक्षा घेतल्या होत्या. आता ही सुविधा कायदा, बॅचलर ऑफ एज्युकेशन (बीएड) आणि इतर तांत्रिक, व्यावसायिक आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांपर्यंत विस्तारित केली जाईल. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी अधिक लवचिकता मिळण्याची अपेक्षा आहे. पहिल्या प्रयत्नांतील गुणांबद्दल असमाधानी असलेले विद्यार्थी पुन्हा परीक्षा देऊन आपल्या कामगिरीत सुधारणा करू शकतील. राज्य सरकार प्रवेशासाठीच्या पात्रता निकषांमध्ये बदल करण्याचाही विचार करत आहे.वेश प्रक्रियेदरम्यान बोर्ड परीक्षेच्या गुणांना महत्त्व देण्याऐवजी इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षेत आवश्यक असलेले किमान एकूण गुण वाढवण्याचा एक प्रस्ताव आहे.

# गड-दुर्ग अभ्यासक आणि संस्थांसाठी 'अमृत शिवदुर्ग भूषण पुरस्कार '

युवावार्ता (प्रतिनिधी०

अहिल्यानगर :- महाराष्ट्रातील गडदुर्गांचा इतिहास, संशोधन, जतन आणि संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी 'अमृत शिवदुर्ग भूषण पुरस्कार-२०२६' जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी इच्छुक नागरिकांना १६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन नामनिर्देशन करता येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या महाराष्ट्रातील गडदुर्गांचा समृद्ध इतिहास जतन करणे, त्यांचे संवर्धन करणे आणि या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहन देणे, हा या पुरस्काराचा प्रमुख उद्देश आहे. युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरविलेल्या ऐतिहासिक किल्ल्यांसह महाराष्ट्रातील गडदुर्गांचा सखोल अभ्यास, इतिहास संशोधन आणि दुर्गसंवर्धनासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या एका व्यक्तीला आणि एका संस्थेला दरवर्षी या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. वैयक्तिक आणि संस्थात्मक अशा दोन विभागांत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. निवड झालेल्या व्यक्तीला तसेच संस्थेला प्रत्येकी ५१ हजार रुपये रोख रक्कम, विशेष सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती आणि संस्थांची निवड पारदर्शक व शास्त्रीय पद्धतीने व्हावी, यासाठी क्षेत्रातील तज्ज्ञ अभ्यासक आणि अनुभवी संशोधकांचा समावेश असलेली 'अमृत शिवदुर्ग भूषण पुरस्कार समिती' स्थापन करण्यात आली आहे. प्राप्त नामनिर्देशन आणि शिफारशींचे सखोल परीक्षण करून समिती अंतिम विजेत्यांची

निवड करणार आहे. गतवर्षी वैयक्तिक विभागातून ज्येष्ठ दुर्गअभ्यासक श्री. प्र. के. घाणेकर यांना, तर संस्थात्मक विभागातून दुर्गसंवर्धनासाठी कार्यरत असलेल्या 'सह्याद्री प्रतिष्ठान' या संस्थेला या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गडदुर्गांचा इतिहास हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि राष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. या ऐतिहासिक वारशाची माहिती जनसामान्यांपर्यंत, विशेषतः तरुण पिढीपर्यंत पोहोचावी, दुर्गभ्रमंती व इतिहास संशोधनाला प्रोत्साहन मिळावे आणि दुर्गसंवर्धनासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना व्यापक ओळख मिळावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील गडदुर्गांचा अभ्यास, इतिहास संशोधन, दुर्गसाहित्याचा प्रचार-प्रसार आणि दुर्गसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या योग्य व्यक्ती व संस्थांची नामनिर्देशने नागरिकांनी करावीत. नामनिर्देशनासाठी www.amrutdurgotsav.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. नामनिर्देशनाचे वेळापत्रक नामनिर्देशन कालावधी : १६ ते ३१ ऑक्टोबर २०२६, अर्जांची छाननी ०२ ते ०३ नोव्हेंबर २०२६ महाराष्ट्राच्या देदीप्यमान दुर्गसंस्कृतीचा वारसा पुढे नेणाऱ्या दुर्गसेवकांचा गौरव करण्यासाठी शिवप्रेमी आणि नागरिकांनी नामनिर्देशन प्रक्रियेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे,असे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

# 'सर्व्हर डाऊन': तांत्रिक अडचण की सोयीस्कर ढाल?

## ऑनलाईन कारभाराच्या झगमगाटात भरडला जाणारा सामान्य नागरिक




**आज सर्व्हर डाऊन आहे, उद्या या...**

साईट चालत नाहीये, लिंक आली की बघू... वरूनच सिस्टीम बंद आहे, आम्ही तरी काय करणार? कोणत्याही शासकीय कार्यालयाची किंवा सेतू केंद्राची पायरी चढणाऱ्या प्रत्येक सामान्य नागरिकाच्या कानावर रोज पडणारी ही प्रातिनिधिक वाक्ये!

आज आपण डिजिटल इंडिया ई-गव्हर्नन्स आणि पेपरलेस प्रशासना'च्या गगनभरारीच्या गप्पा मारत आहोत. शासकीय सेवा ऑनलाईन झाल्यामुळे कारभारात पारदर्शकता येईल, नागरिकांच्या वेळेची बचत होईल आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल, असा एक अत्यंत उदात्त हेतू यामागे होता. परंतु, आजची प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे? ऑनलाईनच्या या झगमगाटात सामान्य नागरिक मात्र सर्व्हर डाऊन च्या अंधाऱ्या गर्तेत पुरता भरडला जात आहे.

**तांत्रिक अडचण की सोयीस्कर ढाल?**

शासकीय संकेतस्थळे आणि पोर्टल्स वारंवार बंद पडण्यामागे तांत्रिक कारणे जरूर असतात.एकाच वेळी लाखोंच्या संख्येने येणारा ट्रॅफिक पेलण्याची क्षमता नसलेले कमजोर सर्व्हर्स, वेळेत न होणारे टेक्निकल मेंटेनन्स, आणि 'एन.आय.सी.' (NIC) किंवा खाजगी कंत्राटदारांवर असणारे अवाजवी अवलंबित्व; या सर्वांमुळे साईट्स क्रॅश होतात, हे वास्तव नाकारता येत नाही. दाखले, पीक विमा, शिष्यवृत्ती किंवा नोकरभरतीची अंतिम तारीख जवळ आली की ही ऑनलाईन सिस्टीम पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळते.

पण या तांत्रिक सत्याच्या पलीकडे एक कटू प्रशासकीय सत्यही दडलेले आहे. अनेकदा साईट चालत नाही हे उत्तर कर्मचाऱ्यांसाठी एक सोयीस्कर ढाल बनते! कामाचा ताण टाळण्यासाठी, अर्जांची छाननी लांबणीवर टाकण्यासाठी किंवा स्वतःच्या कामातील दिरंगाई झाकण्यासाठी वरूनच सर्व्हर बंद आहे असे सांगून सर्वसामान्यांना माघारी धाडणे आता अत्यंत सोपे आणि सवयीचे झाले आहे.

सामान्यांची परवड आणि आयुष्याचा अपव्यय ग्रामीण भागातून किंवा दूरवरून स्वतःचे रोजंदारीचे काम सोडून, पदरमोड करून शासकीय कार्यालयात येणाऱ्या शेतकरी, कष्टकरी आणि विद्यार्थ्यांचे हाल शब्दातीत आहेत.

**विद्यार्थी:** वेळेत दाखला न मिळाल्यामुळे कित्येक गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रियेतील अख्खे वर्ष वाया जाते.

**शेतकरी:** पीक विम्याचा किंवा अनुदानाचा फॉर्म भरायचा राहून गेल्याने नैसर्गिक आपत्तीत शेतकरी हक्काच्या मदतीपासून वंचित राहतो.

**ज्येष्ठ नागरिक:** वृद्ध आणि निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना आपल्या हक्काच्या तुटपुंज्या मानधनासाठी महिनोनमहिने सेतू केंद्रांचे हेलपाटे मारावे लागतात.

डिजिटल क्रांतीचा मुख्य उद्देश नागरिकांचे जिणे सुलभ (Ease of Living) करण्याचा होता; परंतु, योग्य नियोजन आणि सक्षम पायाभूत सुविधांअभावी तीच क्रांती आज सामान्यांच्या मुळावर आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**रस्ता काय आणि बदल कसा होणार?**

प्रशासकीय यंत्रणेने आता केवळ ऑनलाईन पोर्टल्स तयार करून आणि प्स लॉन्च करून हात वर करून चालणार नाही, तर त्या पोर्टल्सची विश्वासार्हता आणि क्षमता वाढवणे गरजेचे आहे.

सर्व्हर क्षमता (Auto-scaling Cloud Services): शासकीय पोर्टल्ससाठी आधुनिक क्लाऊड तंत्रज्ञानाचा वापर करून ट्रॅफिकनुसार सर्व्हरची क्षमता आपोआप वाढेल अशी व्यवस्था करणे अनिवार्य आहे.

पर्यायी ऑफलाईन व्यवस्था: जेव्हा एखादी साईट सलग २४ तास बंद राहते, तेव्हा तातडीने जुन्या पद्धतीनुसार ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची लवचिकता प्रशासनाने दाखवली पाहिजे.

**पारदर्शकता आणि डिजिटल ऑडिट:** महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत ठरवून दिलेल्या मुदतीचे तंतोतंत पालन झालेच पाहिजे. जर तांत्रिक बिघाडामुळे काम रखडले असेल, तर त्याची नोंद सार्वजनिक डॅशबोर्डवर दिसली पाहिजे, जेणेकरून कर्मचाऱ्यांना मनमानी ढाल वापरता येणार नाही.

**डिजिटल क्रांती हे 'साधन' आहे, 'साध्य' नाही!**

डिजिटायझेशन हे जनतेच्या सेवेचे एक माध्यम आहे. जर हे माध्यमच वारंवार निकामी होणार असेल, तर लोकशाहीतील सर्वसामान्य माणूस या प्रशासकीय सिस्टीमवर कसा विश्वास ठेवणार? साईट डाऊन ची ही अदृश्य भिंत पाडून प्रशासनाने खऱ्या अर्थाने स्पीड अप होण्याची हीच योग्य वेळ आहे! अपेक्षा एकच आहे की सर्वर डाऊन आहे साईट बंद आहे हे भूत लवकर उठावे व गोरगरीब कष्टकरी जनतेसाठी दिलासा मिळावा हीच अपेक्षा....

**डॉ.नामदेव गुंजाळ**
**संगमनेर, मो. ९८२२०६०६०४**

# पान १ वरून प्रलंबित मागण्यांसाठी...

आशा सेविका आणि अंगणवाडी कर्मचारीही आंदोलनात सहभागी झाले आहेत. न्याय्य वेतन, रोजगाराची सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा आणि विविध योजनांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी, शेतमजूर, महिला आणि कामगारांच्या प्रश्नांमध्ये परस्परांशी असलेले नाते अधोरेखित करत या आंदोलनाने ग्रामीण महाराष्ट्रातील विविध घटकांना एकाच व्यासपीठावर आणले आहे.

**नमो शेतकरीचे दोन हप्ते द्या; ८१ लाख महिलांचे लाभ पुन्हा सुरू करा!**

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे थकीत दोन हप्ते तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करावेत, अशी मागणी किसान सभेने केली आहे. तसेच ई-केवायसी प्रक्रिया बंद पडल्यामुळे योजनेतून वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आलेल्या ८१ लाख लाडक्या बहिणींना पुन्हा योजनेत समाविष्ट करावे, त्यांचे थकीत मानधन द्यावे आणि ई-केवायसीची प्रक्रिया पुन्हा सुरु ठेवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असताना तांत्रिक अडचणी किंवा प्रक्रियेमुळे लाभार्थ्यांना वंचित ठेवू नये, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

**अकोल्यातील महामुक्कामानंतर मुंबईकडे संघर्षाची आगेकूच**

या मागण्यांसाठी २१ ते २६ ऑक्टोबरदरम्यान अकोले येथे महामुक्काम सत्याग्रह करण्यात आला होता. या कालावधीत सरकारने आंदोलकांशी चर्चा करून मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा किसान सभेने व्यक्त केली होती. मात्र, सकारात्मक तोडगा निघण्याऐवजी पोलिसांमार्फत नोटिसा बजावण्यात आल्याचा आणि वर्षा बंगल्याकडे जाण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप किसान सभेने केला आहे.

या नोटिसांना न जुमानता आंदोलन मुंबईपर्यंत नेण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकशाही मार्गाने मागण्या मांडणे हा जनतेचा अधिकार असून, नोटिसा किंवा दबावामुळे जनतेचे प्रश्न संपणार नाहीत, अशी भूमिका किसान सभेने स्पष्ट केली.

**आज घाटणदेवी येथे मुक्काम; उद्या कसारा घाटातून मुंबईकडे कूच**

अकोले येथून सुरू झालेला वाहन लाँग मार्च २६ ऑक्टोबरच्या रात्री इगतपुरीजवळील घाटणदेवी येथे मुक्काम करणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी सकाळी कसारा घाटातून पुढे मुंबईच्या दिशेने मोर्चाची वाटचाल सुरू राहणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी किसान सभेच्या शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा करून शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि ग्रामीण जनतेच्या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावेत. हे निर्णय केवळ आश्वासनांपुरते न राहता लेखी स्वरूपात मान्य करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

'मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार नाही' हा निर्धार व्यक्त करत किसान सभेने आंदोलन पुढे सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. अकोल्यातून निघालेला हा लाल झेंड्यांचा लाँग मार्च आता मुंबईत सरकार या प्रश्नांना कितपत प्रतिसाद देते, याकडे राज्याचे लक्ष वेधणारा ठरत आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!

राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# महिला सुरक्षिततेसाठी श्रीरामपूर पोलिसांचा अनोखा उपक्रम

## ९१७ महिला तक्रारदारांशी थेट संपर्क



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत श्रीरामपूर विभागाच्या अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाने नवरात्रोत्सव २०२६ दरम्यान राबविलेल्या अनोख्या उपक्रमाची राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दखल घेत कौतुक केले आहे. महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये केवळ तक्रार दाखल करून न थांबता, संबंधित महिलांची आजची परिस्थिती जाणून घेणे, आरोपींकडून पुन्हा त्रास दिला जात आहे का, याची खातरजमा करणे आणि त्यांच्या सुरक्षिततेची प्रत्यक्ष पडताळणी करणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर पोलीस विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सन २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांत महिला व मुलींशी संबंधित दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्यांची माहिती संकलित करण्यात आली. यामध्ये बलात्काराचे २५१, तर विनयभंगाचे ६६६, असे एकूण ९१७ गुन्हे नोंद असल्याचे समोर आले.

या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित तक्रारदार महिलांच्या तक्रारींवर पोलिसांनी केलेल्या कारवाईचा अपर पोलीस अधीक्षक कार्यालयात सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यानंतर महिला पोलीस उपनिरीक्षकांच्या नेतृत्वाखाली सात महिला कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले. या पथकाने नवरात्रोत्सवादरम्यान सर्व ९१७ महिला व मुली तक्रारदारांशी मोबाईलद्वारे थेट संपर्क साधला.

तक्रारदार महिलांशी संवाद साधताना त्यांच्या मूळ तक्रारीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबत समाधान आहे का, संबंधित आरोपीकडून पुन्हा त्रास दिला जात आहे का, पाठलाग करणे किंवा अन्य प्रकारे त्रास देण्याचे प्रकार सुरू आहेत का, अशा महत्त्वाच्या बाबींची माहिती घेण्यात आली. त्यामुळे केवळ कागदोपत्री कारवाईचा आढावा न घेता, पीडित महिलांच्या प्रत्यक्ष सुरक्षिततेची स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या संवादादरम्यान ८४६ महिला व मुलींनी पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवर योग्य कारवाई केल्याचे सांगत समाधान व्यक्त केले. तसेच संबंधित आरोपींकडून सध्या कोणताही त्रास होत नसल्याची सकारात्मक प्रतिक्रिया दिली. मात्र, ७१ महिलांनी आरोपींकडून अद्याप त्रास होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. या महिलांकडून त्रासाचे स्वरूप आणि संबंधित घटनांची सविस्तर माहिती घेण्यात आली.

ज्या महिलांनी आरोपींकडून पुन्हा त्रास होत असल्याचे सांगितले आहे, त्यांच्या तक्रारींची गंभीर दखल पोलिसांनी घेतली आहे. संबंधित आरोपींवर स्वतः लक्ष घालून पुढील दहा दिवसांत कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच संबंधित महिला नव्याने गुन्हा दाखल करण्यास तयार असल्यास, कायद्यानुसार पुढील गुन्हा नोंदविण्याची कार्यवाहीही करण्यात येणार आहे.

या उपक्रमातून महिलांच्या सुरक्षिततेबाबत पोलिसांची जबाबदारी केवळ गुन्हा दाखल करण्यापुरती मर्यादित नसून, तक्रारीनंतरही पीडित महिलांच्या परिस्थितीवर लक्ष ठेवणे आणि त्यांना आवश्यक संरक्षण मिळत आहे की नाही, याची खात्री करणे किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित झाले आहे.

श्रीरामपूर पोलिसांनी राबविलेल्या या उपक्रमाची राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दखल घेतली. त्यांनी आपल्या इन्स्टाग्राम खात्यावरून या उपक्रमाचे कौतुक करत जिल्हा पोलीस अधीक्षक आणि अपर पोलीस अधीक्षक यांचे अभिनंदन केले. पोलीस प्रशासनाने महिला सुरक्षेसाठी राबविलेल्या या अभिनव प्रयत्नाला राज्यस्तरावर मिळालेली दखल महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

प्रशासकीय कामकाजात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी ही बाब निश्चितच प्रेरणादायी आहे. महिला अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये तक्रारींचा नियमित पाठपुरावा, पीडित महिलांशी थेट संवाद आणि आरोपींकडून होणाऱ्या संभाव्य त्रासावर वेळीच कारवाई, या बाबींचा एकत्रित विचार करणारा श्रीरामपूर पोलिसांचा हा उपक्रम राज्यातील

# इंदोरीच्या खडकाळी परिसरात बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील इंदोरी खडकाळी परिसरात सोमवारी (दि. २६) पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एक बिबट्या- जेरबंद झाला. गेल्या काही दिवसांपासून खडकाळी परिसरात दोन-तीन बिबट्यांचा वावर वाढल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. एका बिबट्याला पकडण्यात यश आले असले, तरी याच परिसरात आणखी दोन बिबटे फिरत असल्याची माहिती स्थानिक शेतकऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे. वन विभागाने तातडीने आणखीं पिंजरे लावावेत, अशी मागणी होत आहे.

खड़काळी आणि नागझिरी परिसरात जंगल, लपण्यासाठी सुरक्षित जागा आणि पाण्याची उपलब्धता असल्याने अनेक वर्षांपासून बिबट्यांचा वावर आहे. सध्या पाण्याच्या आणि अन्नाच्या शोधांत बिबटे मानवी वस्तीजवळ येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मागील महिनाभरांपासून शेतात रात्री पाणी देताना तसेच पहाटे दूध घेऊन जातांना शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन होत होते. त्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणे आणि जनावरांची देखभाल करणे शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

आठ दिवसांपूर्वी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सुधाकर गायकवाड यांची मोठी शेळी बिबट्याने ठार केली होती. या घटनेनंतर स्थानिक शेतकरी गंगाधर देवराम नवले, सुधाकर गायकवाड, मच्छिंद्र गायकवाड, गोरक्ष गायकवाड आणि ताराचंद पांडुरंग नवले यांनी बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली होती.

त्यानुसार ४ दिवसांपूर्वी भूषण गंगाधर नवले यांच्या शेताच्या कोपऱ्यावर पिंजरा लावण्यात आला होता. मात्र, बिबट्या पिंजऱ्याच्या आसपास फिरून निघून जात असल्याने तो जेरबंद होत नव्हता. अखेर सोमवारी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास बिबट्या पिंजऱ्यात अडकला. पिंजऱ्यात अडकल्यानंतर बिबट्याने मोठ्या आवाजात डरकाळ्या फोडत पिंजऱ्याला जोरदार धडका दिल्या. त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर जखमा होऊन रक्त आले होते, अशी माहिती प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनी दिली. हा बिबट्या अंदाजे सहा ते सात वर्षांचा असून शरीराने ताकदवान आणि धष्टपुष्ट असल्याचे स्थानिकांनी सांगितले. एका बिबट्याला जेरबंद करण्यात आले असले, तरी परिसरातील धोका पूर्णपणे टळलेला नाही. त्यामुळे वन विभागाने खडकाळी आणि नागझिरी परिसराची पाहणी करून बिबट्यांच्या वावराचा मागोवा घ्यावा आणि आवश्यक त्याठिकाणी अतिरिक्त पिंजरे लावावेत, अशी मागणी पांडुरंग कारभारी नवले आणि स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

# फायनान्सच्या तगाद्याला कंटाळून तरुणाची आत्महत्या

लातूर (वृत्तसंस्था)

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील राणी अंकुलगा येथील तरुण दत्तात्रय सूर्यकांत कुंभार (२६) याने विविध फायनान्सचे लाखो रुपयांचे कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या हप्त्यांची परतफेड होत नसल्यामुळे व मायक्रो फायनान्सच्या वसुलीच्या तगाद्याला कंटाळून त्याने सुसाईड नोट लिहून गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी उघडकीस आली.

दत्तात्रयने विविध मायक्रो फायनान्सकडून १७ लाख रुपयांचे कर्ज घर खर्च व व्यवसायासाठी घेतले होते. त्याने सुसाईड नोटमध्ये लिहिले आहे की, मला कर्जाची परतफेड करणे शक्य होत नाही. सध्या दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे निराशेपोटी मी माझ्या राहत्या घरी आत्महत्या करीत आहे. मी आत्महत्या केल्यानंतर शासनाने माझे कर्ज माफ करावे. माझ्या आई-वडील, पत्नीला कर्ज वसुलीचा त्रास होऊ नये अशी विनंती त्याने केली आहे. मयत दत्तात्रयच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन लहान मुले असा परिवार आहे. यासंदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे अधिकारी अक्षय जाधव यांच्याशी संपर्क साधला असता अद्याप आमच्याकडे कोणीच तक्रार केली नसल्याने त्यांनी सांगितले.

# संस्कार, जिद्द आणि परिश्रमातूनच यशाची शिखरे पादाक्रांत - पंकज कवडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शाळेत मिळालेल्या संस्कारांच्या शिदोरीला अखंड जिद्द, सातत्य आणि कष्टाची जोड देऊनच खडतर परिस्थितीवर मात करत शिक्षण विस्तार अधिकारी पदापर्यंत मजल मारता आली. या यशाचे खरे श्रेय विद्यालयातील गुरुजन आणि माझ्या कुटुंबियांना जाते, असे भावोद्गार पंचायत समिती संगमनेर येथे नवनिर्वाचित शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झालेले विद्यालयाचे माजी विद्यार्थी पंकज कवडे यांनी काढले.

नांदुरी दुमाला येथील सुपुत्र व सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात माध्यमिक व नामदार बाळासाहेब थोरात उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी पंकज कवडे यांची पंचायत समिती संगमनेर येथे शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल विद्यालयात नुकताच त्यांचा भव्य सत्कार



समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

पुढे बोलताना कवडे म्हणाले की, सध्याच्या तीव्र स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता अवांतर वाचन व सातत्यपूर्ण अभ्यासावर भर दिला पाहिजे. अपार परिश्रमांतून यश खेचून आणत आई-वडिलांचे व गावाचे स्वप्न साकार करावे, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राजहंस दूध संघाचे संचालक विलासशेठ कवडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. शिक्षक आणि कुटुंबियांच्या प्रेरणेने स्पर्धा परीक्षा, तंत्रज्ञान तसेच संशोधनाच्या क्षेत्रात पदार्पण करून गावाचे नाव उज्ज्वल करावे. आपल्याच शाळेचा विद्यार्थी आज उच्च पदावर पोहोचल्याचा सार्थ अभिमान संपूर्ण गावाला व विद्यालयाला आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी सरपंच निखिल निळे, बाजार समितीचे माजी संचालक मारूतीशेठ कवडे, कृषीकन्या दूध संस्थेचे चेअरमन सिताराम पाटील शेटे, प्रभारी मुख्याध्यापक प्रमोद देशमुख, शिक्षक प्रतिनिधी पावसे सर, उपरे सर व गुंजाळ सर यांनी आपली मनोगते व्यक्त करून पंकज कवडे यांच्या यशाचे कौतुक केले. स्कूल कमिटीचे अध्यक्ष साहेबराव कवडे (तात्या) यांनीही त्यांचे विशेष अभिनंदन करून पुढील भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव आयोजित 'गांधी संस्कार परीक्षे'तील सहभागी गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

या गौरव सोहळ्यास सेवानिवृत्त कृषी सहाय्यक दगडू कराळे, जि. प. प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल कवडे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पथवे, जि. प. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कानवडे मॅडम, दुस्सा सर, शिंदे सर यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक अनिल गुंजाळ, मनोज उपरे, किशोर शिंदे, भाऊसाहेब पावसे, राजेंद्र शिंदे, अशोक गुंजाळ, श्रीमती रोहम मॅडम, ज्यूनियर कॉलेजचे प्रा. सय्यद सर, प्रा. राऊत सर, प्रा. सौ. कवडे मॅडम, प्रा. सौ. गोर्डे मॅडम, प्रा. सौ. गायके मॅडम, शिंदे एम. एस., सुनील कवडे, राजेंद्र कदम, अरुण कवडे, निलेश गांडाळ, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुंदर सूत्रसंचालन अनिल गुंजाळ यांनी केले, तर उपस्थितांचे आभार भाऊसाहेब पावसे यांनी मानले.



# जिथं मन मोठं, तिथं कार्य थोर...

## समाजकार्याचा दीपस्तंभ – जयवंत गडाख साहेब

काही व्यक्ती आपल्या आयुष्यात केवळ भेटत नाहीत, तर आपल्या विचारांवर आणि मनावर एक कायमस्वरूपी प्रभाव सोडून जातात. त्यांची विचारशक्ती, संवेदनशीलता, नम्रता आणि समाजकार्यातील निष्ठा इतकी उत्तुंग असते की, त्यांचं जीवन केवळ व्यक्तिगत न राहता संपूर्ण समाजासाठी एक मार्गदर्शक दीपस्तंभ ठरतं. श्री. जयवंत गडाख साहेब हे असंच एक विलक्षण आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व!

साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा वस्तुपाठ घालून देणाऱ्या गडाख साहेबांशी माझी असलेली मैत्री ही केवळ व्यक्तिगत औपचारिकतेपुरती मर्यादित नसून, ती समान मूल्यांवर आणि सामाजिक बांधिलकीवर आधारित आहे. आज त्यांच्या वाढदिवसाच्या शुभप्रसंगी त्यांच्या सामाजिक वाटचालीचा आणि जीवनप्रवासाचा मागोवा घेताना मनाला अत्यंत अभिमान आणि आनंद होत आहे.

**प्रेरणादायी सुरुवात: विचार ते प्रत्यक्ष कृती-** साधारण तीस वर्षांपूर्वी गडाख साहेबांच्या मनात एक विचार अंकुरला ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या आनंदवनात जावं, तिथे राहावं आणि त्यांचं कार्य जवळून समजून घ्यावं.

आजच्या काळात अनेक लोक सामाजिक विषयांवर चर्चा करतात, परंतु गडाख साहेबांनी तो विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवला. ते आनंदवनात गेले, तिथे राहिले, समर्पणाची भावना अनुभवली आणि नवसंवेदनांनी भरलेल्या मनाने परतले. समाजाचं काहीतरी देणं लागतो हीच प्रेरणा घेऊन त्यांनी 'स्नेहालय' (अहिल्यानगर) या संस्थेत माझे मित्र गिरीशभाऊ कुलकर्णी यांच्या माध्यमातून पाऊल ठेवले. संस्थेचे विश्वस्त म्हणून जबाबदारी स्वीकारत त्यांनी आपल्या सामाजिक वाटचालीची एक नवी आणि उत्तुंग दिशा निश्चित केली.

**निस्वार्थ वृत्ती आणि व्यापक सामाजिक विस्तार**

संगमनेर तालुक्यातील पारेगाव या ग्रामीण भागातून उगम पावलेलं हे व्यक्तिमत्त्व आज मुंबईसारख्या महानगरातही आपल्या कार्याने समाजाशी घट्ट जोडलेलं आहे. विविध संस्थांमधील योगदान: ते सध्या 'स्नेहालय सामाजिक पुनर्वसन संस्था', 'अनामप्रेम' अंध-अपंग वसतीगृह, तसेच निंबळक येथील 'गौरांग विद्यालय' (अंध-अपंग शाळा व औद्योगिक प्रशिक्षण केंद्र) येथे विश्वस्त म्हणून अत्यंत मोलाची भूमिका बजावत आहेत.

**संपर्कांचे सेतू:** देशातील महान समाजसुधारक भाईजी आमच्या संगमनेर भेटीवर आले होते. या भेटीचे मुख्य श्रेय जयंतराव यांनाच जाते. त्यांच्यामुळेच डॉ. सुधीर तांबे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या 'जयहिंद लोकचळवळ' या संस्थेला आणि आम्हा सर्वांना भाईजींचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**ऋणानुबंधांची जपणूक:** राजकीय, सामाजिक, साहित्यिक, कला आणि उद्योग क्षेत्रातील अनेक दिग्गजांशी त्यांचे आपुलकीचे आणि विश्वासाचे संबंध आहेत.

**'चायना व्हॅली': उपजीविकेसोबतच सामाजिक संस्कृतीचा प्रयोग-**

मुंबईतील वरळी परिसरातील 'चायना व्हॅली' हे रेस्टॉरंट केवळ उत्कृष्ट खाद्यसंस्कृतीचे केंद्र नसून गडाख साहेबांच्या सुंदर व्यवस्थापनाचे आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे.

सुनील गावस्कर, नितीन गडकरी, दीपक केसरकर आणि बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या अनेक नामवंतांनी येथे दिलेली भेट ही या ठिकाणच्या गुणवत्ता, शिस्त आणि आदरातिथ्याचा सन्मान आहे. स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे असो किंवा गरजूंना मदत करणे असो, गडाख साहेबांनी व्यावसायिक यश मिळवतानाही आपली सामाजिक नाळ नेहमी जपली आहे.

**साधेपणात महानता शोधणारा आदर्श समाजपुरुष**

समाजासाठी काहीतरी करायचं असेल तर मोठी पदं किंवा यंत्रणा लागतेच असं नाही; सर्वात महत्त्वाचं असतं ते आपलं मोठं मन, निर्मळ भावना आणि निस्वार्थ श्रद्धा! श्री. जयवंत गडाख साहेब यांनी आपल्या कृतीतून हेच सिद्ध केले आहे. प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर राहून, संयमी वृत्तीने आणि निरलस भावनेने लोकांच्या हृदयात घर करणारे ते एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व आहेत. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड, निरोगी आणि दीर्घ आयुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांनी पेरलेली सेवेची आणि प्रेमाची ही वाटचाल अशीच निरंतर पुढे चालू राहो, हीच ईश्वराचरणी प्रार्थना.

- वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा, गडाख साहेब!

**डॉ.नामदेव गुंजाळ**
**संगमनेर, मो. ९८२२०६०६०४**

# आश्वी पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध सुरू

आश्वी : आश्वी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांमध्ये तपासकामी पोलीसांना चकवा देणाऱ्या फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी आश्वी पोलिसांच्या वतीने धडक मोहीम राबविण्यात येत आहे. या फरार आरोपींची माहिती पोलिसांना कळवावी, असे आवाहन आश्वी पोलिसांनी केले आहे.या मोहिमेअंतर्गत आश्वी पोलीसांना श्याम पवार (रा. आश्वी खुर्द), लक्ष्मण वर्षे (रा. राहुरी), सुमित बोंद्रे (रा. पिंप्री-लौकी), गणेश नागरे (रा. खळी), सिध्देश घुगे (रा. पानोडी), रवींद्र दातीर (रा. खांबे) व एक महिला हे सात संशयित पोलीसांना हवे आहेत. चालू वर्षात आश्वी पोलिसांनी विविध गुन्ह्यांमधील तब्बल १० फरार आरोपींना जेरबंद करून गजाआड केले असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांनी दिली. उर्वरित फरार आरोपींनाही लवकरच पकडले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. फरार आरोपींबाबत कोणालाही काही गोपनीय माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ आश्वी पोलीस ठाण्याशी संपर्क साधून पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन शिरसाठ यांनी केले आहे.

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डॉ. स्वप्निल राजेश देवकर रा. (माळीवाडा) लींकरोड, एच. डी. एफ. सी. बँकेवर, नविन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. ०००१०९५३, सि. स. नं. -- स.नं. १४३/११/१४३/१२ १ ला २ मजला या ठिकाणी मध्ये देवकर बाल रूग्णालय (देवकर चिल्ड्रन हॉस्पिटल) चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २७/१०/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

# संपादकीय...

## राजकारणातील भाषेचा घसरलेला स्तर लोकशाहीच्या प्रतिष्ठेला तडा !

राजकारण म्हणजे केवळ सत्ता मिळविण्याचे साधन नव्हे, तर समाजाला दिशा देण्याचे, जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्याचे प्रभावी माध्यम आहे. मात्र, अलीकडच्या राजकीय वातावरणात भाषेचा घसरत चाललेला स्तर हा चिंतेचा विषय बनला आहे. जनतेच्या प्रश्नांवर ठोस चर्चा करण्याऐवजी एकमेकांवर वैयक्तिक टीका करणे, अपमानास्पद शब्दांचा वापर करणे, धमकीवजा वक्तव्ये करणे आणि सार्वजनिक व्यासपीठांचा वापर आरोप-प्रत्यारोपांसाठी करणे, अशा प्रवृत्तीमुळे राजकारणाच्या प्रतिष्ठेलाच धक्का बसत आहे. लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मतभेद असणे स्वाभाविक आहे. उलट, सत्तेला प्रश्न विचारणारा विरोधी पक्ष आणि प्रश्नांना उत्तर देणारे सत्ताधारी हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र, मतभेद व्यक्त करताना विवेक, संयम आणि सभ्यतेची मर्यादा पाळणे आवश्यक असते. आज अनेकदा धोरणात्मक चुका, विकासकामांचा अभाव, बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत विषयांपेक्षा कोण कोणाला काय बोलले, कुणी कुणाचा अपमान केला आणि कुणी कुणाला प्रत्युत्तर दिले, यालाच अधिक प्रसिद्धी मिळताना दिसते. राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांमधील आक्रमकपणा हा अनेकदा माध्यमांच्या चर्चेचा आणि समाजमाध्यमांवरील लोकप्रियतेचा विषय ठरतो. परिणामी, संयतपणे मुद्दे मांडणाऱ्यांपेक्षा वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्यांची अधिक चर्चा होते. यातून राजकारणात नेमके कोणते गुण महत्त्वाचे मानले जात आहेत, असा प्रश्न उपस्थित होतो. राजकीय नेते हे समाजातील प्रभावशाली व्यक्तिमत्त्व असतात. त्यांच्या बोलण्याकडे तरुणाईसह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष असते. त्यामुळे त्यांच्या भाषेचा समाजावर परिणाम होणे स्वाभाविक आहे. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींनी वापरलेले अपमानास्पद शब्द समाजमाध्यमांवर वेगाने पसरतात. समर्थक आणि विरोधकही त्याच भाषेत एकमेकांवर टीका करू लागतात. त्यातून राजकीय मतभेदांचे रूपांतर वैयक्तिक वैरात होण्याचा धोका वाढतो. राजकीय विचार वेगळे असणे हा लोकशाहीचा दोष नाही; परंतु विचार वेगळे असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचा सन्मान नाकारणे ही निश्चितच चिंताजनक बाब आहे. विरोधक हा शत्रू नसतो, तर वेगळा विचार मांडणारा लोकशाहीतील सहप्रवासी असतो, ही जाणीव राजकीय नेत्यांनी कायम ठेवली पाहिजे. राजकीय वक्तव्यांना प्रसिद्धी देताना माध्यमांनीही त्यातील आशय आणि सार्वजनिक महत्त्व तपासणे गरजेचे आहे. केवळ वादग्रस्त शब्दांना ठळक मथळे देऊन चर्चा वाढविण्याऐवजी संबंधित नेत्यांनी जनतेच्या प्रश्नांवर काय भूमिका मांडली, त्यांच्या दाव्यांमागे कोणते तथ्य आहे आणि प्रत्यक्ष कामगिरी काय आहे, याला प्राधान्य मिळायला हवे. समाजमाध्यमांवरील वापरकर्त्यांनीही कोणतीही क्लिप किंवा वक्तव्य पडताळणी न करता प्रसारित करणे टाळले पाहिजे. राजकारणातील भाषेचा स्तर उंचावण्यासाठी केवळ कायदे किंवा नियम पुरेसे नाहीत. त्यासाठी राजकीय पक्षांच्या नेतृत्वाने स्पष्ट भूमिका घेणे, सार्वजनिक चर्चेत सभ्यतेला प्रोत्साहन देणे आणि कार्यकर्त्यांना जबाबदार संवादाचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी आपल्या वक्तव्यांतून विरोधकांच्या धोरणांवर टीका करावी; मात्र व्यक्तीची प्रतिष्ठा, कुटुंब किंवा खासगी आयुष्य यांना लक्ष्य करण्याचे टाळावे. जनतेनेही राजकीय नेत्यांचे मूल्यमापन त्यांच्या घोषणांपेक्षा कामावर, वक्तृत्वापेक्षा विचारांवर आणि आरोपांपेक्षा पुराव्यांवर करायला हवे. मतदारांनी सभ्य संवादाची अपेक्षा व्यक्त केली, तर राजकीय वर्तुळालाही आपली भाषा आणि कार्यपद्धती यांचा पुनर्विचार करावा लागेल. शेवटी प्रश्न एवढाच आहे की, राजकारणात कोण मोठे ठरणार-विचार की अपशब्द? लोकशाहीची ताकद आवाजाच्या मोठेपणात नसते, तर विचारांच्या गुणवत्तेत असते. सभ्य भाषेतही परखड टीका करता येते, ठाम भूमिका मांडता येते आणि सत्तेला जाब विचारता येतो. त्यासाठी अपमानास्पद शब्दांचा आधार घेण्याची गरज नाही. राजकारणातील भाषेचा स्तर उंचावणे ही केवळ राजकीय नेत्यांचीच नव्हे, तर माध्यमे, कार्यकर्ते आणि नागरिक यांचीही सामूहिक जबाबदारी आहे. कारण राजकारणातील शब्द केवळ भाषणापुरते मर्यादित राहत नाहीत; ते समाजाच्या विचारविश्वावर परिणाम करतात. सत्तेसाठी संघर्ष जरूर असावा; पण त्या संघर्षात संस्कार, संयम आणि सभ्यता हरवता कामा नये. हीच लोकशाहीच्या सुदृढ भविष्यासाठी काळाची गरज आहे.

# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट माळवाडी (बोटा) मध्ये जागतिक पोलिओ दिनानिमित्त जनजागृती



युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा): दरवर्षी २४ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या जागतिक पोलिओ दिनानिमित्त श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन संचलित श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट, माळवाडी (बोटा) येथील फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने पोलिओ निर्मूलन, लसीकरणाचे महत्त्व आणि बालकांच्या निरोगी आरोग्याबाबत जनजागृतीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी संजना जाधव व तृप्ती रकते यांनी केले. प्रथम वर्षातील विद्यार्थी ओम गुंजाळ, मोहन दाभाडे यांनी आपल्या भाषणातून पोलिओ आजाराची लक्षणे, काळजी, उपाय आणि शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या लसीकरण मोहिमेचे महत्व विशद केले. विद्यालयाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी पायल खेमनार, स्वामिनी शेळके, ओम गुंड, सना शेख व साक्षी रूपवते यांनी 'पोलिओचा अंत करूया, प्रत्येक बालकाचे संरक्षण करूया' हा संदेश देणारे नाट्य सादर करून समाजात आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्याचे आवाहन करण्यात केले. तसेच तृतीय वर्षातील विद्यार्थिनी तेजस्विनी पोखरकर, सिद्धी शेळके आणि अनुष्का सोलाट यांनी माहितीपर पोस्टर द्वारे पोलिओ लसीकरणाचा संदेश दिला.

संस्थेचे सचिव डॉ अमित पोखरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की पोलिओ हा विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून, त्यामुळे बालकांना कायमस्वरूपी अपंगत्व येऊ शकते. मात्र, वेळेवर आणि योग्य पद्धतीने लसीकरण केल्यास या आजारापासून संरक्षण मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक बालकाचे पोलिओ लसीकरण पूर्ण करणे, पालकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे आणि पोलिओमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ शिवाजीराव पोखरकर यांनी 'थेंब छोटे, स्वप्ने मोठी' या संदेशातून प्रत्येक बालकाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. बालकांना पोलिओपासून संरक्षण मिळाल्यास त्यांचे भविष्य अधिक सुरक्षित, निरोगी आणि सक्षम होऊ शकते. यासाठी पालक, आरोग्य कर्मचारी, शैक्षणिक संस्था आणि समाजातील प्रत्येक घटकाने लसीकरण मोहिमेला सहकार्य करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक आरोग्यविषयक जाणीव आणि जनजागृतीला प्रोत्साहन देण्याचा संस्थेचा हा उपक्रम प्रा निशा वरे यांच्या मार्गदर्शनाखाली इव्हेंट मॅनेजमेंट कमिटीच्या सदस्यांनी अत्यंत प्रभावीपणे आयोजित केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ शिवाजीराव पोखरकर, सचिव डॉ अमित पोखरकर, प्राचार्य डॉ सागर सांगळे, डॉ अक्षदा सूर्यवंशी, प्रा लहू तांदळे, प्रा आकाश शेळके, प्रा स्वप्नील वरे, प्रा ज्योत्स्ना शेलार, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# मालपाणी विद्यालयाचे तीन संघ रिंग टेनिसमध्ये जिल्हा विजेते; विभागीय स्पर्धेसाठी निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांचा, १४ वर्षांखालील मुलींचा आणि १७ वर्षांखालील मुलींचा अशा तीनही संघांनी जिल्हास्तरीय शालेय रिंग टेनिस स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा विजेतेपद पटकावले. या तिन्ही संघांची विभागीय स्तरावरील शालेय रिंग टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संगमनेर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत दहा शाळांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत मालपाणी विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांच्या, १४ वर्षाखालील मुलींच्या तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हा विजेतेपद पटकावले. या तिन्ही संघांनी मिळवलेले यश विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत भर घालणारे ठरले आहे. विभागीय स्तरावरील स्पर्धेतही हे संघ नक्कीच उत्कृष्ट कामगिरी करतील विजेत्या खेळाडूंना क्रीडा शिक्षिका तथा पर्यवेक्षिका रंजना पवार, सुनील आढळ तसेच मार्गदर्शक बाबा गायकवाड आणि राजेंद्र थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी अभिनंदन केले.


Shri Baleshwar Shaikshanik va Krushi Vikas Foundation

**SHRI SWAMI SAMARTH INSTITUTE OF MANAGEMENT AND TECHNOLOGY, MALWADI (BOTA)**

(Approved by AICTE Recognized by DTE Mumbai (Government of Maharashtra) and Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University)
At-Malwadi, Post-Bota, Tal- Sangamner, Dist.- Ahilyanagar 414502
Website: https://www.sssi.edu.in Email ID: shrisamarthcoe@gmail.com Contact No. 7588094642

(Permanently Non-Granted)

**RECRUITMENT**

Applications are invited from the eligible candidates for the various positions on permanently non-granted basis. The application with supporting documents should reach to the undersigned, "President/Secretary, Shri Baleshwar Shaikshanik va Krushi Vikas Foundation At-Malwadi, Po. Bota, Tal Sangamner" within 21 (twenty one) days from the date of publication of this advertisement. Applications with incomplete information or documents, or received after the due date will not be considered.

The detailed about the vacant positions, reservations, educational qualifications, experience and other requirement, pay scale, terms and conditions and the procedure for application is available on the college website (https://www.sssi.edu.in) and university website (www.dbatu.ac.in).

Place: Malwadi
Date: 26 /10 /2026

President / Secretary
Shri Baleshwar Shaikshanik va Krushi Vikas Foundation
At-Malwadi,Po.Bota,Tal Sangamner



युवावार्ता
छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
AAYESHA SIDDIKA MUDIR BAGWAN
NEW NAME AS
AYESHA SIDDIKA MUDIR BAGWAN
ADHAR- 315611896252
ADD - BAGWANPURA, NEAR OLD GPO, NAVGHAR GALLI, SANGAMNER, AHMEDNAGAR, 422605, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I declare by this publication about change in my name.
OLD NAME:
NARENDR RAMBHAU BHOR.
CHANGE IN TO MY NEW NAME:
NARENDRA RAMBHAUBHO
Radd. At-Ambad, Tal-Akole, A. Nagar
Adhar-424045166023

CHANGE IN NAME
I declare by this publication about Change in my name
OLD NAME:
SHRUTI NARENDR BHOR.
CHANGE IN TO MY NEW NAME:
SHRUTI NARENDRA BHOR
address: At-Ambad, Tal-Akole, Akole, A.Nagar
Adhar-275819876700


## ग्रामपंचायत सांगवी सूर्या ब-१ निविदा नोटीस

प्रशासक /ग्रामपंचायत अधिकारी सांगवी सूर्या, ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांचे कडून खालील कामाचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा.बा.विभाग यांचे कडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सीलबंद ब-१ दोन लिफाफा पद्धतीने ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | योजना | निविदा विक्री | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे सांगवी सूर्या येथे पाणीपुरवठा विहीर दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | २३६/- | -- | २२५७५०/- | ६ महिने | सु.बे |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत **सांगवी सूर्या** कार्यालयात **दि.२७/१०/२०२६ ते दि. ०३/११/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा **दि. ०३/११/२०२६** पर्यंत रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा. प. **सांगवी सूर्या** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत **सांगवी सूर्या** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. ०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत **सांगवी सूर्या** ता पारनेर, जि-अ. नगर येथे पार पडेल निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब-१ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅप पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु.बे. साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सूट राहील नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅप पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबे साठी प्रमाणपत्रावर सूट चा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फि भरलेची पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. सांगवी सूर्या, ता. पारनेर, जि. अ.नगर**

**प्रशासक**
**ग्रा.पं. सांगवी सूर्या, ता. पारनेर, जि. अ.नगर**

## ग्रामपंचायत पळसपूर ब-१ निविदा नोटीस

प्रशासक /ग्रामपंचायत अधिकारी पळसपूर, ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांचे कडून खालील कामाचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा.बा.विभाग यांचे कडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सीलबंद ब-१ दोन लिफाफा पद्धतीने ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | योजना | निविदा विक्री | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पळसपूर येथे सिमेंट टाकी बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग | २३६/- | -- | २९५०२४/- | ६ महिने | सु.बे |
| २ | मौजे पळसपूर येथे कारवाडी जि.प. शाळा शौचालय बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग | २३६/- | -- | २९१४८५/- | ६ महिने | सु.बे |
| ३ | मौजे पळसपूर येथे गावठाण अंगणवाडी सुशोभीकरण करणे | १५ वा वित्त आयोग | २३६/- | १% | ८४१८१/- | ६ महिने | खुला |
| ४ | मौजे पळसपूर येथे कारवाडी जि.प. प्रा. शाळा सुशोभीकरण करणे | १५ वा वित्त आयोग | २३६/- | -- | ८४१०३/- | ६ महिने | म.स.स. |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत **पळसपूर** कार्यालयात **दि.२७/१०/२०२६ ते दि. ०३/११/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा **दि. ०३/११/२०२६** पर्यंत रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा. प. **पळसपूर** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत **पळसपूर** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. ०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत **पळसपूर** ता पारनेर, जि-अ. नगर येथे पार पडेल निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब- १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅप पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु.बे. साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सूट राहील नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅप पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबे साठी प्रमाणपत्रावर सूट चा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फि भरलेची पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. सांगवी सूर्या, ता. पारनेर, जि. अ.नगर**

**प्रशासक**
**ग्रा.पं. सांगवी सूर्या, ता. पारनेर, जि. अ.नगर**


पाहिजेत
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

CHANGE IN NAME
I declare by this publication about change in my name
OLD NAME:
RANJANA NARENDR BHOR
CHANGE IN TO MY NEW NAME:
RANJANA NARENDRA BHOR
Add. : At-Ambad, Tal-Akole, A.Nagar,
Adhar-620415089124

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Karimabi Bashir Kha
NEW NAME AS
Karima Munir Sayyad
Address:- Juna jorve road Madina Nagar Alka Nagar Jawal Sangamner 422605 Dist - Ahilyanagar

SR THORAT
पाहिजेत
मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक
आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे.
साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

| १.क्रं | गाडीचा प्रकार |
|---|---|
| १ | छोटा हत्ती |
| २ | टाटा झिप |
| ३ | महिंद्रा जीतो |
| ४ | मारुति सुजुकी सुपर कॅरि |

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७




पाहिजेत
ऑफिसबॉय ( शिपाई )
02 जागा (पुरुष )
शैक्षणिक पात्रता - 10/12 वी पास
वय मर्यादा - 20 ते 40 वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दिनांक 26/10/2026 पर्यंत जमा करावे
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अशोक चौक, संगमनेर
फोन नं. 02425-220777
9623017997
Email- mahesh.patsanstha@gmail.com

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरुष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल ( रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

पाहिजेत
मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

# १ नोव्हेंबरपासून नवे नियम लागू?

मुंबई (वृत्तसंस्था)

जीएसटीशी संबंधित काम सामान्यांना समजतच नाही. सीए किंवा इतर तज्ज्ञांच्या मदतीने छोटे व्यापारी तसेच सामान्यांना आपली कामे करून घ्यावी लागतात. परंतु आता जीएसटीची प्रक्रिया जास्त सुलभ व्हावी यासाठी सरकार महत्त्वाचे पाऊल उचलणार आहे. जीएसटीच्या काही नियमात सरकार बदल करणार आहे. हे नियम १ नोव्हेंबर २०२६ रोजीपासून लागू होण्याची शक्यता आहे. या नियमांमुळे जीएसटीशी संबंधित कामे सोपी होणार आहेत.सरकार जीएसटीबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या विचारात आहे. या निर्णयाचा फायदा छोटे व्यापारी, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर सामान विकणाऱ्यांना होऊ शकतो. नव्या नियमांनुसार सरकार जीएसटी रजिस्ट्रेशनची प्रक्रिया सोपी होऊ शकत. तसेच कर परतावा (टॅक्स रिफंड) लवकर मिळू शकतो. या नियमांचा फायदा अनेक राज्यांना होणार आहे.

एखाद्या राज्यात छोट्या व्यापाऱ्यांचे ऑफिस नसेल तर अशा वेळी व्यापारी ई-कॉमर्सच्या वेअरहाऊसला व्यापाराचे मुख्य स्थान म्हणून सरकार दरबारी सांगू शकतात. परंतु अशा प्रकारची नोंद करण्याआधी संबंधित व्यापाऱ्याचे एखाद्या तरी राज्यात व्यापार सुरू असायला हवा. दुसऱ्या राज्यातील रजिस्ट्रेशन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या सहमतीने पूर्ण केले जाऊ शकेल. या निर्णयामुळे साधारण ९.५ लाख छोट्या विक्रेत्यांना लाभ मिळणार मिळू शकणार आहे.नव्या निर्णयाअंतर्गत जीएसटी रजिस्ट्रेशनही सोपे होणार आहे.

सरकार जीएसटी रजिस्ट्रेशनसाठी अनिवार्य कागदपत्रे तसेच इतर प्रक्रियेबाबत स्पष्ट निर्देशही देऊ शकते. जीएसटी पोर्टलवर अर्ज भरण्याची प्रक्रियाही सोपी होऊ शकते. या निर्णयामुळे अपरे कागदपत्रं तसेच चुकीच्या माहितीमुळे अर्ज फेटाळण्याचे प्रमाण कमी होईल. परिणामी जीएसटी रजिस्ट्रेशन सोपे होईल.

# कर्जत-भीमाशंकर जंगलतोड विरोधात संगमनेरकरांचे निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आणि भीमाशंकर परिसरातील शेकडो एकर जंगल कथित प्रकल्पाच्या नावाखाली नष्ट केले जात असल्याचा गंभीर आरोप करत, या विनाशकारी जंगलतोडीला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी संगमनेर तालुक्यातील पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी केली ने आहे. याबाबत अनेक स्थानिक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षरीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रांताधिकारी अरुण उंडे यांच्यामार्फत निवेदन ने सादर करण्यात आले. तर या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, सध्या वाढते तापमान, पाण्याची तीव्र टंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे जनता होरपळून निघत आहे. यंदाच्या उन्हाळ्यात राज्यातील अनेक भागांत तापमान ४५ ते ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले असून नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. अशा गंभीर परिस्थितीत विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश करणे चिंताजनक असून यामुळे स्थानिक पर्यावरण, जैवविविधता आणि वन्यजीवांचे अधिवास धोक्यात आला आहे. एका बाजूला राज्यातील नागरिकांना पाणीटंचाई आणि वाढत्या तापमानाचा सामना करावा लागत असताना दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. नुकतेच कुंभमेळ्याचे

कारण देत नाशिक मधील हजारो झाडांची कत्तले करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकल्पाच्या नावाखाली पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होणार असेल, तर अशा प्रकल्पांचा गांभीर्याने पुनर्विचार करणे आवश्यक आहे. या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी महत्त्वाच्या प्रशासनासमोर मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये कर्जत व भीमाशंकर परिसरातील सुरु असलेली कथित जंगलतोड तात्काळ थांबवणे, या प्रकल्पासाठी करण्यात येणारी वृक्षतोड, पर्यावरणीय मंजुरी व वनविषयक परवानग्यांची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी ठाम भूमिका घेण्यात आली आहे. निवेदनावर रवींद्र दिवे, ओंकार बिडवे, जयसिंग सहाने, रामू चन्ना, संदीप काकड, विश्वनाथ भुजबळ, अनिकेत घुले, समीर लामखडे, सचिन साळवे, रजत अवसक, संपादक किसन हासे, हिरालाल पगडाल, कैफ तांबोळी, बादशहा सोनवणे आदी पर्यावरणप्रेमी व स्थानिक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी

## विद्या विद्यापीठ तर्फे मोफत दंत तपासणी शिबीर

युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर -विद्यार्थ्यांचे उज्ज्वल शैक्षणिक भवितव्य घडविण्यासोबतच त्यांच्या शारीरिक व मौखिक आरोग्याची काळजी घेण्याच्या सामाजिक कटिबद्धतेतून, विद्या विद्यापीठ शैक्षणिक संस्थेच्या वतीने संगमनेर येथील व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये दंत तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात १५ तज्ज्ञ डॉक्टरांनी (दंतवैद्यांनी) सहभाग नोंदवत सुमारे ३०० हून अधिक विद्यार्थ्यांची सखोल दंत तपासणी केली.




विद्या विद्यापीठ या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नामदेवराव गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी सन १९८३ मध्ये पहिल्या सर्वरोग निदान शिबिराचे संगमनेर मध्ये आयोजन करून समाजसेवेची मुहूर्तमेढ रोवली होती. त्याच सामाजिक बांधिलकीतुन आरोग्याच्या या दंत तपासणी शिबिराची आखणी करण्यात आली होती.

या शिबिराचे उद्घाटन एसएमबीटी दंत महाविद्यालय व रुग्णालयाचे प्राध्यापक व प्रमुख पाहुणे डॉ. शैलेंद्र सिंह यांच्या शुभहस्ते करण्यात आले. व्यासपीठावर विद्या विद्यापीठ या संस्थेचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गुंजाळ, व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. हर्षवर्धन गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मिश्रा आणि विद्यार्थ्यांना दंत आरोग्य किट उपलब्ध करून देणारे डॉ. शुभम गोडगे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मार्गदर्शन करताना व्हिजन कोचिंग इन्स्टिटयूटचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. हर्षवर्धन गुंजाळ म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यास, स्पर्धा परीक्षा आणि गुणांच्या शर्यती बरोबरच स्वतःच्या शारीरिक आरोग्याकडेही तितकेच गांभीर्याने पाहिले पाहिजे. मुखाचे (तोंडाचे) व दातांचे आरोग्य उत्तम असेल तर अन्नग्रहण, संवाद आणि दैनंदिन दिनचर्या सुरळीत राहते. विद्यार्थ्यांनी नियमितपणे दातांची स्वच्छता राखावी, पोषक आहार घ्यावा आणि वेळोवेळी तज्ज्ञ डॉक्टरांकडून दंत तपासणी करून घ्यावी. संस्थेत शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले जाते. डॉ हर्षवर्धन गुंजाळ पुढे म्हणाले की कधीकधी असं होतं... वर्षभर रात्रंदिवस घाम गाळून केलेला अभ्यास, लावलेली ताकदीची बाजी आणि ऐन परीक्षेच्या तोंडावर अचानक दात ठणकू लागतो! त्या एका लहानशा वेदनेमुळे संपूर्ण एकाग्रता ढळते, मेंदू सुन्न होतो आणि वर्षभराची मेहनत कागदावर उतरवताना अक्षरशः संघर्ष करावा लागतो. ही वेळ कोणत्याही विद्यार्थ्यावर येऊ नये, कारण एक छोटीशी शारीरिक तक्रार त्यांच्या भविष्यातील यशाच्या मार्गात अडथळा ठरू नये याच संवेदनशील विचारातून आम्ही ही 'पूर्वकाळजीची' मोहीम हाती घेतली आहे. परीक्षा जवळ आल्यावर धावपळ करण्यापेक्षा आधीच आरोग्य तपासणी व्हावी, जेणेकरून आमचा प्रत्येक विद्यार्थी कोणत्याही वेदनेशिवाय, तणावमुक्त आणि पूर्ण आत्मविश्वासाने आपल्या यशाची गुढी रोवू शकेल! शिबिराचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे डॉ. शैलेंद्र सिंह यांनी आपल्या मनोगतात डॉ. हर्षवर्धन गुंजाळ यांचे व विद्या विद्यापीठ या संस्थेच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. दातांची योग्य निगा राखल्यास भविष्यातील गंभीर आजार व समस्या वेळीच टाळता येतात.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांना वेळेवर वैद्यकीय सल्ला व तपासणीची संधी मिळावी, या उद्देशानेच या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. ऐश्वर्या साळवे, डॉ.ओंकार चाटे, डॉ. श्रुती पाटील, डॉ. आदित्य सरागे, डॉ. आतिम बेग, डॉ. श्रेया पगारे, डॉ. सृष्टी परसुरे, डॉ. सिद्धेश्वर उगलमुगले, डॉ. मायावती वाहूले, डॉ. सुशांत उगलमुगले, डॉ. स्मृतीमेधा मोहोतो या दंतवैद्यांच्या पथकाने प्रत्येक विद्यार्थ्याची वैयक्तिक तपासणी केली. दातांची निगा कशी राखावी, ब्रश करण्याची योग्य पद्धत कोणती, आणि दातांच्या समस्या उद्भवू नये म्हणून कोणत्या सवयी बाळगाव्यात, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

## पान १ वरून

## डॉ. सुदीप किसन हासे यांची...

विविध सामाजिक सस्थांशी जोडले गेलेले आहेत.

त्यांची शैक्षणिक कारकीर्दही उल्लेखनीय राहिली आहे. त्यांनी अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून अभियांत्रिकीची पदवी (बी.ई.) आणि पदव्युत्तर पदवी (एम.ई.) संपादन करताना दोन्ही अभ्यासक्रमांत प्रथम क्रमांक पटकाविला होता.

त्यांच्या पीएच.डी. संशोधनासाठी संशोधन मार्गदर्शक डॉ. मेघा सिंग, विभागप्रमुख डॉ. अतुल अगरवाल, डॉ. ममता मीना, रिसर्च डीन डॉ. धीरज नीम, अभियांत्रिकी विभागाचे डीन डॉ. शैलेंद्र सिंग आणि प्रो-चान्सलर डॉ. ध्रुव घई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संशोधनाची दिशा अधिक स्पष्ट होण्यास आणि संशोधनकार्य यशस्वीरीत्या पूर्ण करण्यास मदत झाली.

व्यवसाय, व्यवस्थापन आणि संशोधन यांचा समतोल साधत मिळविलेले हे यश त्यांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीचे, चिकाटीचे आणि ज्ञानार्जनाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक मानले जात आहे. युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे आणि सुशीला किसन हासे यांनी केलेल्या कष्टाचे आज चीज झाले. त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करताना विशेष आनंद असल्याचे डॉ. सुदीप हासे यांनी यावेळी सांगितले.

त्यांच्या या यशामागे कुटुंबीयांचे प्रोत्साहन, संशोधन मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ. सुदीप हासे यांच्या या यशामुळे संगमनेरच्या शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आह

## दिनविशेष

१९६९: — तारापूर अणूवीज निर्मिती केंद्र सुरू झाले.
१९४०: — दुसरे महायुद्ध ईटलीने ग्रीसवर हल्ला केला.
१९२२: — बेनिटो मुसोलिनीच्या नेतृत्त्वाखाली ईटलीतील फॅसिस्टांनी रोममधील सरकार उलथवले.
१९०४: — पनामा आणि उरुग्वे यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१८८६: — अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ग्रोव्हर क्लीव्हलँड यांनी स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा राष्ट्राला अर्पण केला.
१६३६: — अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठाची (Harvard University) स्थापना.
१४९०: — क्रिस्टोफर कोलंबस पहिल्या प्रवासानंतर क्युबा मध्ये पोहोचले.
१४२०: — बीजिंगला अधिकृतपणे मिंग साम्राज्याची राजधानी म्हणून नियुक्त केले गेले

## जन्म

१९७९: जावेद करीम — युट्यूबचे सहसंस्थापक
१९६७: ज्यूलिया रॉबर्टस — अमेरिकन अभिनेत्री
१९५८: अशोक चव्हाण — महाराष्ट्राचे १६वे मुख्यमंत्री
१९५६: मोहम्मद अहमदिनेजाद — ईराणचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९५५: इंद्रा नूयी — भारतीय वंशाच्या अमेरिकन कॉर्पोरेट अधिकारी
१९५५: बिल गेटस् — मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक
१९३०: अंजान — प्रसिद्ध गीतकार (निधन: १३ सप्टेंबर १९९७ )
१९१४: जोनास साल्क — पोलिओची लस शोधणारे अमेरिकन विषाणूशास्त्रज्ञ (निधन: २३ जून १९९५ )
१८९३: शंकर केशव कानेटकर — कवी गिरीश तथा (निधन: ४ डिसेंबर १९७३ )
१८९३: कवी गिरीश — शंकर केशव कानेटकर ऊर्फ (निधन: ४ डिसेंबर १९७३ )
१८६०: कानो जिगोरो — ज्युदोचे संस्थापक (निधन: ४ मे १९३८ )

## मृत्यू

२०२२: नील पवन बरुआ — भारतीय चित्रकार (जन्म: १ जून १९३६ )
२०१३: राजेंद्र यादव — भारतीय लेखक (जन्म: २८ ऑगस्ट १९२९ )
२०११: श्री लाल शुक्ला — भारतीय लेखक (जन्म: ३१ डिसेंबर १९२५ )
२०१०: लिआँग काँगजिरे — चीन देशाचे पर्यावरणवादी, फ्रेंड्स ऑफ नेचरचे संस्थापक (जन्म: ४ ऑगस्ट १९३२ )
२०१०: जोनाथन मोट्झफेल्ड — ग्रीनलँड देशाचे पहिले पंतप्रधान (जन्म: २५ सप्टेंबर १९३८ )
२००२: इर्लिंग पर्स्सन — एच अँड एमचे संस्थापक (जन्म: २१ जानेवारी १९१७ )
१९८३: ओटो मेसमर — अमेरिकन व्यंगचित्रकार आणि ॲनिमेटर, फेलिक्स द कॅटचे सह-निर्मिते (जन्म: १६ ऑगस्ट १८९२ )
१९४४: हेलन व्हाईट — डॉक्टरेट मिळवणारी पहिली अमेरिकन महिला (जन्म: २८ नोव्हेंबर १८५३ )
१९००: मॅक्स मुल्लर — जर्मन विचारवंत (जन्म: ६ डिसेंबर १८२३ )
१८११: यशवंतराव होळकर बहादूर — राजराजेश्वर सवाई श्रीमंत (जन्म: ३ डिसेंबर १७७६ )
१७०८: प्रिन्स जॉर्ज — डेन्मार्कचे राजकुमार (जन्म: २ एप्रिल १६५३ )
१६२७: जहांगीर — ४ था मुघल सम्राट (जन्म: ३१ ऑगस्ट १५६९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२८ ऑक्टोबर**

## १९६९: — तारापूर अणूवीज निर्मिती केंद्र सुरू झाले

महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील तारापूर येथे भारतातील पहिले अणूवीज निर्मिती केंद्र उभारण्यात आले. भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील हा एक ऐतिहासिक टप्पा मानला जातो. देशातील वाढती विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी अणुऊर्जेचा वापर करण्याच्या उद्देशाने या केंद्राची स्थापना करण्यात आली. भारत आणि अमेरिका यांच्या सहकार्याने हा प्रकल्प उभारण्यात आला.तारापूर अणूवीज निर्मिती केंद्रातील पहिल्या दोन अणुभट्ट्यांची उभारणी १९६० च्या दशकात करण्यात आली. या दोन्ही अणुभट्ट्यांची प्रत्येकी १६० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता होती. या अणुभट्ट्यांमध्ये उकळत्या पाण्याच्या अणुभट्टीचे तंत्रज्ञान वापरण्यात आले. २८ ऑक्टोबर १९६९ रोजी या केंद्रातून व्यावसायिक तत्त्वावर वीज निर्मिती सुरू झाली. त्यामुळे भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या विकासाला महत्त्वाची चालना मिळाली.अणुऊर्जा निर्मितीमध्ये अणूच्या केंद्रकाचे विखंडन करून मोठ्या प्रमाणावर उष्णता निर्माण केली जाते. या उष्णतेच्या साहाय्याने वाफ तयार केली जाते. वाफेच्या दाबामुळे टर्बाइन फिरते आणि जनित्राच्या माध्यमातून वीज निर्माण होते. या प्रक्रियेत कोळसा किंवा पेट्रोलियम पदार्थांसारख्या इंधनांचे ज्वलन आवश्यक नसते. त्यामुळे वीज निर्मितीच्या प्रक्रियेदरम्यान कार्बन डायऑक्साइडचे थेट उत्सर्जन तुलनेने कमी असते.तारापूर केंद्राच्या स्थापनेमुळे भारताला अणुऊर्जा तंत्रज्ञानाचा अनुभव मिळाला. या प्रकल्पातून भारतीय वैज्ञानिक, अभियंते आणि तंत्रज्ञांना अणुभट्ट्यांचे संचालन, देखभाल आणि सुरक्षिततेच्या व्यवस्थापनासंबंधी महत्त्वाचे ज्ञान प्राप्त झाले. पुढील काळात देशात इतर अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठीही या अनुभवाचा उपयोग झाला.कालांतराने तारापूर अणूवीज निर्मिती केंद्राचा विस्तार करण्यात आला. येथे प्रत्येकी ५४० मेगावॅट क्षमतेच्या आणखी दोन अणुभट्ट्या उभारण्यात आल्या. या अणुभट्ट्यांमध्ये दाबयुक्त जड पाण्याचे तंत्रज्ञान वापरण्यात आले. त्यामुळे केंद्राची एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमता १,४०० मेगावॅट झाली.अणुऊर्जा निर्मिती करताना सुरक्षिततेला विशेष महत्त्व दिले जाते. अणुभट्ट्यांचे नियमित निरीक्षण, यंत्रणांची देखभाल, किरणोत्सर्गाचे नियंत्रण आणि किरणोत्सर्गी कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते. या बाबींचे पालन करून अणुऊर्जा निर्मिती सुरक्षितपणे करण्यावर भर दिला जातो.तारापूर अणूवीज निर्मिती केंद्र हे भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमातील महत्त्वाचे केंद्र आहे. १९६९ मध्ये सुरू झालेल्या या केंद्राने देशाच्या ऊर्जा क्षेत्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारताने अणुऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रगतीच्या इतिहासात तारापूर केंद्राला विशेष स्थान आहे.

# अशोक चव्हाण - महाराष्ट्राचे १६ वे मुख्यमंत्री

**जन्मदिन विशेष**

अशोक चव्हाण यांचा जन्म २८ ऑक्टोबर १९५८ रोजी झाला. ते महाराष्ट्रातील ज्येष्ठ राजकीय नेते असून त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. त्यांचे वडील शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते होते. वडिलांच्या राजकीय कार्याचा वारसा पुढे नेत अशोक चव्हाण यांनी राजकारणात स्वतःची ओळख निर्माण केली.अशोक चव्हाण यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. युवक काँग्रेसमध्ये काम करताना त्यांनी संघटनात्मक कार्याचा अनुभव घेतला. पुढे ते महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी आमदार, खासदार आणि राज्य मंत्रिमंडळातील मंत्री म्हणून विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. नांदेड हा त्यांच्या राजकीय कार्याचा प्रमुख केंद्रबिंदू राहिला आहे.राज्याच्या मंत्रिमंडळात काम करताना त्यांनी सार्वजनिक बांधकाम, नगरविकास यांसारख्या खात्यांची जबाबदारी



सांभाळली. तसेच काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक कार्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्रातील विविध राजकीय आणि प्रशासकीय घडामोडींमध्ये त्यांचा सहभाग राहिला.२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्रात नेतृत्वबदल झाला. ८ डिसेंबर २००८ रोजी अशोक चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २००९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर ते पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यांनी डिसेंबर २००८ ते नोव्हेंबर २०१० या काळात राज्याचे नेतृत्व केले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या क्रमवारीत त्यांचा उल्लेख १६वे मुख्यमंत्री असा केला जातो.मुख्यमंत्रिपदाच्या काळात अशोक चव्हाण यांचे नाव आदर्श गृहनिर्माण सोसायटी प्रकरणामुळे चर्चेत आले. या प्रकरणावरून राजकीय वाद निर्माण झाला आणि नोव्हेंबर २०१० मध्ये त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.२०१४ मध्ये अशोक चव्हाण नांदेड लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले.त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपदही सांभाळले. फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्याच वर्षी ते महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून गेले.अशोक चव्हाण यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदार आणि राज्यसभा सदस्य अशा विविध पदांवर काम केले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात, विशेषतः नांदेड जिल्ह्यात, त्यांचे महत्त्वाचे स्थान राहिले आहे. त्यांचा राजकीय प्रवास हा राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचा आणि पक्षीय घडामोडींचा एक महत्त्वाचा भाग आहे. अशोक चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्यातील विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध सार्वजनिक प्रश्नांवर राजकीय पातळीवर काम केले आहे. मराठवाड्यातील राजकारणात त्यांचा प्रभाव राहिला असून त्यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील विविध विकासविषयक विषयांवर भूमिका मांडली. २०२४ मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर त्यांची राज्यसभेवर निवड झाली. सध्या ते राज्यसभेचे सदस्य म्हणून राष्ट्रीय राजकारणात कार्यरत आहेत.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## दुष्काळग्रस्त गरजू कुटुंबांना मिळणार 'दिवाळीचा शिधा' - आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ नये, तसेच दुष्काळग्रस्त आणि गरजू कुटुंबांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळावा, या माणुसकीच्या भावनेतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ' दिवाळीचा शिधा' उपलब्ध झाला आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून तालुक्यातील दुष्काळाची तीव्रता अधिक असलेल्या भागांतील गरजू कुटुंबांना लवकरच या शिध्याचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.



आमदार खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा, रोजगार हमीची कामे, अपूर्ण पाणीपुरवठा योजना आणि शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीच्या प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी आमदार खताळ म्हणाले की, तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन टंचाई आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. ज्या गावांमध्ये प्रत्यक्षात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, अशा गावांमध्ये आवश्यकतेनुसार पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत. एखाद्या गावातून टँकर सुरू करण्याची मागणी आल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष न करता किंवा कोणत्याही प्रकारची दिरंगाई न करता तातडीने टँकर उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

येत्या काळात दुष्काळाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन तालुक्यातील जलस्त्रोत आणि उपलब्ध पाणीसाठ्यांचे नियोजन करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत आहे. जलजीवन मिशन तसेच इतर पाणीपुरवठा योजनांची ७५ ते ८० टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. या योजनांची उर्वरित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. या योजना पूर्ण झाल्यास संबंधित गावांमधील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागण्यास मदत होईल. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केवळ टँकरवर अवलंबून न राहता स्थानिक पातळीवर पाण्याचे स्त्रोत निर्माण करणेही गरजेचे आहे. त्यासाठी लहान-मोठे जलस्त्रोत विकसित करणे, विहिरींचे खोलीकरण करणे, तसेच नादुरुस्त पाइपलाइन आणि पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी स्पष्ट केले.

## राहुल गांधींना दिल्ली व्यापाऱ्यांचे पुन्हा पत्र

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

दिल्लीतील रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर रोजी होणारी इंडिया आघाडीची रॅली पुढे ढकलण्याची मागणी पुन्हा एकदा करण्यात आली आहे. चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री या व्यापारी संघटनेने अवघ्या चार दिवसांत दुसऱ्यांदा काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पत्र लिहून ही रॅली दिवाळीनंतर १० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्याची विनंती केली आहे. रॅलीमुळे राजधानीतील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होण्याबरोबरच दिवाळीच्या काळातील व्यापारावर मोठा परिणाम होण्याची भीती संघटनेने व्यक्त केली आहे.

व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बृजेश गोयल यांनी राहुल गांधी यांना लिहिलेल्या पत्रात रॅलीसाठी १५ ते २० हजार वाहनांमधून सुमारे १० लाख लोक दिल्लीमध्ये येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. एवढ्या मोठ्या संख्येने लोक आणि वाहने दाखल झाल्यास वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते. तसेच वाहतुकीवरील निर्बंधांमुळे चांदणी चौक, सदर बाजार यांसह दिल्लीतील सुमारे २० प्रमुख बाजारपेठांमधील व्यापारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे व्यापाऱ्यांचे सुमारे १० हजार कोटी रुपयांचे नुकसान होऊ शकते, असा दावा संघटनेने केला आहे. विशेष गहन मतदार यादी पुनरावलोकनाच्या विरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी ही रॅली आयोजित करण्यात येणार आहे. मात्र, व्यापाऱ्यांच्या मागणीला उत्तर देताना राहुल गांधी यांनी रॅली पुढे ढकलण्यास नकार दिल्याचे वृत्त आहे. त्यांनी समाजमाध्यमांवरील संदेशातून दिल्लीतील व्यापाऱ्यांचे म्हणणे ऐकले जात असल्याचे नमूद केले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. संघटनेच्या दाव्यानुसार, १० ऑक्टोबर रोजी झालेल्या आंदोलनामुळे व्यापाऱ्यांना सुमारे तीन हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. त्याच पार्श्वभूमीवर आगामी रॅलीमुळे दिवाळीच्या व्यापाराला फटका बसू नये, अशी व्यापाऱ्यांची भूमिका आहे. आता इंडिया आघाडी रॅलीच्या तारखेत बदल करणार का, याकडे दिल्लीतील व्यापारी आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## भीमाशंकरच्या जंगलावर कुऱ्हाड
### सरकारकडून भलावन, नागरीकांचा विरोध



युवावार्ता (प्रतिनिधी)

भीमाशंकर - सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या आणि जैवविविधतेचा अनमोल ठेवा लाभलेल्या भीमाशंकर परिसरातील तब्बल सहाशे एकर क्षेत्रावरील जंगलतोडीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका प्रकल्पासाठी व उद्योगपतींचे हीत साधण्यासाठी निसर्गसंपन्न वनक्षेत्रावर कुऱ्हाड चालवली जात असल्यामुळे पर्यावरणप्रेमी, स्थानिक नागरिक आणि निसर्ग संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या घटकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. एकीकडे विकासाच्या नावाखाली उद्योगपतींच्या हिताला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप होत असताना, दुसरीकडे जंगल आणि पर्यावरण वाचविण्यासाठी जनतेतून विरोधाचा सूर उमटत आहे.

भीमाशंकर हे केवळ धार्मिक पर्यटनस्थळ नसून पश्चिम घाटातील पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्वाचा परिसर आहे. येथील घनदाट जंगल, दुर्मिळ वनस्पती, वन्यजीव आणि नैसर्गिक जलस्त्रोत यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या जंगलावर होणारा कोणताही परिणाम केवळ झाडांपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण परिसंस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. जंगलतोडीमुळे वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येण्याबरोबरच पाण्याचे स्त्रोत, मातीची धूप आणि स्थानिक पर्यावरणाचा समतोलही बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

विकास प्रकल्पांच्या माध्यमातून उद्योगांना प्रोत्साहन देताना पर्यावरणीय परिणामांचा गांभीर्याने विचार केला जातो का, असा सवाल आता उपस्थित होत आहे. उद्योगपतींच्या हितासाठी शासन यंत्रणा अनुकूल भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. मात्र, संबंधित प्रकल्पाचे स्वरूप, जंगलतोडीची व्याप्ती आणि शासनाच्या अधिकृत निर्णयांची माहिती समोर आल्यानंतरच या आरोपांची वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकेल. निसर्ग हा कोणत्याही उद्योगपतीची खासगी मालमत्ता नसून भावी पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची सामूहिक जबाबदारी आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा अपरिमित ऱ्हास होत असेल, तर अशा विकासाच्या दिशेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. जंगलतोडीबाबत पारदर्शक माहिती सार्वजनिक करावी, पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करावा आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी पुढे येत आहे. भीमाशंकरचे जंगल वाचविणे ही केवळ स्थानिकांची लढाई नसून पर्यावरणाच्या भवितव्याशी निगडित बाब आहे. सरकार उद्योगांच्या हिताला किती महत्त्व देते आणि निसर्गसंवर्धनासाठी किती ठाम भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

## सोने-चांदीचे दर पुन्हा घसरले

मुंबई (वृत्तसंस्था)

दिवाळीपूर्वी सोने आणि चांदीच्या किमतीत चढ-उतार सुरू आहेत. सोनं आजवरच्या उच्चांकापासून सुमारे २५% आणि चांदी ५५% पर्यंत स्वस्त झाली आहे. आज कामकाजाच्या आठवड्याच्या दुसऱ्या दिवशी जागतिक बाजारात सोने-चांदीचे दर घसरलेत. जागतिक बाजारात सोनं घसरून प्रति औंस ४,००० डॉलरच्या आसपास व्यवहार करत आहे. सततच्या घसरणीनंतर सकाळी सुमारे ९ वाजता डेशु वर सोनं ०.४६% घसरून प्रति औंस ४,०१९.९० डॉलरवर व्यवहार करताना दिसले. चांदीचे दर १.३७% पर्यंत घसरले आणि किंमत प्रति औंस ५३.५९५ डॉलरवर व्यवहार करताना दिसली देशांतर्गत बाजारातही दर कोसळले,

## कऱ्हे घाटाजवळ फ्रॉन्क्स कारची दुचाकीला धडक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- नाशिक - महामार्गावरील कऱ्हे घाट परिसरातील हॉटेल कृष्णा गार्डनसमोर भरधाव कार ने रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिल्याने भीषण अपघात. अपघातानंतर ही दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला असणाऱ्या दरीत कोसळली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु दोन्ही वाहनांची मात्र प्रचंड मोडतोड झाली. हा अपघात आज सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, बजाज व्ही-१५ दुचाकी हॉटेल कृष्णा गार्डनसमोर रस्त्याच्या कडेला उभी होती. त्याच वेळी संगमनेरमार्गे नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या मारुती सुझुकी फ्रॉन्क्स या चारचाकी कारचालकाल रस्त्यात उभी असलेली ही दुचाकी गाडी कार दिसली नाही. त्यामुळे या कारने उभ्या दुचाकीला उभ्या जोरात धडकली. या धडकेमुळे चारचाकी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. कार रस्त्याच्या कडेला असलेल्या खोलगट भागात जाऊन थांबली. तर दुचाकी दूर फेकली गेली. अचानक घडलेल्या या अपघातामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, वाहनांचे मोठे नुकसान झाले.

या घटनेमुळे महामार्गालगत वाहने उभी करताना तसेच वाहन चालवताना चालकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

वाहनांची मोडतोड, जीवितहानी टळली



चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोंबार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमोक्षणाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग • अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग • मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट • स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25